●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ११७ ●रविवार, दि. २७ जुलै २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये
● Beed (Maharashtra) ● Year 5 ●Issue 117 ● Sunday, 27July 2025 ● RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ● Page 1 ● Pages 4 ●Price 3 Rs.




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# "मंत्रिपदासाठी माझी जात आडवी येतेय!



## ...'राष्ट्रवादी'ने मराठ्यांचा फक्त वापर केला"

## ● अजित पवारांच्या आमदाराकडून घरचा आहेर

**पुणे । प्रतिनिधी**

मागच्या पाच टर्मपासून आमदार असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रकाश सोळंके यांनी थेट स्वपक्षावर आणि अजित पवारांवर गंभीर आरोप केले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने बीड जिल्ह्यात मराठा समाजाचा केवळ आणि केवळ वापर केला. मंत्रिपद देण्याची संधी आली तेव्हा ओबीसी आणि मागासवर्गीयांना संधी दिली. असा घणाघात आमदार सोळंकेंनी केला. शुक्रवारी पुण्यामध्ये बोलताना अजित पवारांनी धनंजय मुंडेंना मंत्रिपद देण्याविषयी भाष्य केलं होतं. त्यांच्यावरील आरोप बाजूला झाले की त्यांना संधी देऊ, असं पवार म्हणालेले. त्यानंतर अनेक स्तरांमधून संताप व्यक्त होत आहे. त्यातच बीडच्या माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रकाश सोळंके यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. सोळंकेंना मंत्रिपद मिळण्याविषयी चर्चा होत होती, त्यावर ते बोलते. काय म्हणाले प्रकाश सोळंके?

मंत्रिपदासाठी माझी जात आडवी येतेया मी पाचवी टर्म आमदार आहे, अनुभवी आहे, मला पक्षाचा (राष्ट्रवादी काँग्रेस) ३५ वर्षांचा इतिहास माहिती आहे. पक्षश्रेष्ठींच्या दृष्टीने बीड जिल्हा हा ओबीसींसाठी राखीव असावा, असं वाटतंय. इथे बहुजन समाजाता कुठलंही ▶▶ उर्वरित पान २ वर

## माझ्यासमोर बसलेल्या व्यक्तिला वाल्मिक कराडचा तुरुंगातून फोन... अंबादास दानवेंनी टाकला बॉम्ब; राजकीय वर्तुळ हादरलं

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

नुकताच विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी पत्रकार परिषद घेऊन राजकीय वर्तुळात खळबळ निर्माण केलीये. वाल्मिक कराडबद्दल त्यांनी अत्यंत मोठा दावा केलाय. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडवर गंभीर आरोप असून तो सध्या कोठडीत आहे. अंबादास दानवे म्हणाले की, आताही वाल्मिक कराड जेलमधून सर्व काही करीत आहे. माझ्यासमोर बसलेल्या एका व्यक्तीला जेलमधून वाल्मिक कराडचा फोन आला होता. मी हे तीन महिन्यापूर्वी सांगितले होते, चौकशी झाली पाहिजे, असे त्यांनी म्हटले. थेट त्यांनी मोठा आरोप केलाय.



संजय शिरसाट आणि माधुरी मिसाळ यांच्यातील वादाबद्दल बोलताना अंबादास दानवे म्हणाले, त्या खात्याचे मंत्री बैठक घेऊ शकतात. एवढेच नाही तर काम असेल तर दुसऱ्या खात्याचे मंत्री देखील बैठक घेऊ शकतात. जनतेच्या कामासाठी राज्यमंत्री असे बैठक घेऊ शकतात. मात्र, धोरण काय ते माहिती नाही. ही लोकशाहीमधील यंत्रणा आहे. याला स्वीकारली पाहिजे. सिस्टीम आहे ▶▶ उर्वरित पान २ वर

## मुंडेंच्या मंत्री म्हणून परतण्याच्या चर्चेदरम्यान

## जरांगेंनी मुख्यमंत्री फडणवीस, अजित पवारांवर डागली तोफ

**जालना । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांचे राज्य मंत्रिमंडळात पुनरागमन होऊ शकते या चर्चे वरून मराठा आरक्षण कार्यकर्ते मनोज जरांगे यांनी शनिवारी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर जोरदार टीका केली. शुक्रवारी पुण्यात पत्रकारांशी बोलताना पवार म्हणाले होते की, मुंडे यांच्यावरील चौकशीतून ते निर्दोष सुटल्यास त्यांना संधी दिली जाईल. पवार यांनी अधिक



स्पष्टीकरण दिले नसले तरी, ते ज्या चौकशीबद्दल बोलत होते, ती बीड सरपंच हत्या प्रकरणासंदर्भात होती, ज्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या या आमदाराला फडणवीस सरकारमधून बाहेर पडावे लागले होते, अशी चर्चा सुरू आहे.

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे गेल्या वर्षी ९ डिसेंबर रोजी अपहरण करून, छळ करून त्यांची हत्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## परळी येथील विद्यार्थी दुर्घटना प्रकरणी;

## पालकांनी विद्यार्थ्यांना जवळच्या प्राथमिक शाळेत प्रवेश द्यावा : शिक्षणाधिकारी फुलारी यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील टोकवाडी येथील इयत्ता दुसरी मध्ये शिक्षण घेत असलेल्या तळेगाव येथील वैष्णवी गोविंद मुंडे या खाजगी इंग्लिश स्कूलमध्ये शिकणाऱ्या मुलीचा दुचाकीच्या धडकेने जीव गेला. या संदर्भात प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी, प्राथमिक शाळेतील इयत्ता पाचवी पर्यंतच्या मुलांना दूरच्या शाळेत न घालता, गावातच आणि जवळच्या शाळेत घालण्याचे आवाहन केले आहे.

यासंदर्भात बोलतांना शिक्षणाधिकारी फुलारी म्हणाले, परळी येथील इयत्ता दुसरीच्या वर्गात शिकणाऱ्या कुमारी वैष्णवी हिचा दुचाकीच्या धडकेने मृत्यू झाला. ही दुर्दैवी आणि दुःखदायक घटना आहे. या निमित्ताने बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या पालकांना आवाहन करण्यात येते की, प्राथमिक शाळेत प्रवेशप्राप्त विद्यार्थ्यांना नजिकच्या शाळेत प्रवेश द्यावा.

दूरच्या शाळेत विद्यार्थ्यांना रिक्षा, स्कूल बस यामध्ये पाठवताना जास्तीचे विद्यार्थी बसविले जातात. त्यांच्या सुरक्षेची हमी नसते. धोका होईल, असे वर्तन होऊ नये. प्राथमिक शिक्षण कोठेही घेतले तरी, विद्यार्थी घडू शकतात. थोर विचारवंत, महापुरुष हे आपल्या गोवा शिकले. पालकांनी जिल्हा परिषदेच्या अधिकृत व अनुदानित शाळेतच मुलांना प्रवेश द्यावा. आपल्या नजरेसमोर गावात जवळच्या शाळेत प्रवेश द्यावा. लहान मुलांना समज नसते. सुरक्षितेचे सुरक्षितेची जाणीव नसते. यामुळे पालकांनी आणि शिक्षण प्रेमींनी या संदर्भात गांभीर्याने दखल घ्यावी, असे आवाहन शिक्षणाधिकारी फुलारी यांनी केले आहे.

## महाराष्ट्रातील 7 खासदारांनी दिल्लीत नाव गाजवलं

## सुप्रिया सुळे, वर्षा गायकवाड यांच्यासह निशिकांत दुबेंनाही संसदरत्न पुरस्कार

**नवी दिल्ली**

संसदेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या एकूण १७ खासदारांना संसदरत्न पुरस्कार २०२५ देण्यात आलाय. भाजप, काँग्रेस, शिंदे गट आदी पक्षांच्या खासदारांना पुरस्कार प्राप्त झाला आहे. सुप्रिया सुळे आणि श्रीरंग बारणे यांना विशेष ज्युरी पुरस्कारानेही गौरवण्यात आले आहे. संसदेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी १७ खासदारांना संसदरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं आहे. या पुरस्कार यादीत सुप्रिया सुळे, रवी किशन,



निशिकांत दुबे, अरविंद सावंत यांच्यासहित इतर खासदारांचा समावेश आहे. या यादीत महाराष्ट्रातील ७ खासदारांचा समावेश आहे.

संसदेतील चार खासदारांना विशेष ज्युरी पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. यात भाजपचे भर्तृहरि महताब, खासदार एन के प्रेमचंद्रन, सुप्रिया सुळे, श्रीरंग अप्पा बारणे यांच्या नावाचा समावेश आहे. या सर्वांनी १६ व्या लोकसभेपासून चांगली कामगिरी केली आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## भर पावसात वंचितचे 'होडी चलाव' आंदोलन आणि खड्ड्यांना दिला खासदार, आमदारांच्या नावाचा 'सन्मान'



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील धानोरा रोड परिसरातील ३० मीटरचा मुख्य रस्ता गेल्या पंधरा वर्षांपासून अत्यंत खराब स्थितीत असून, अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, नागरिकांना दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. धुळीकाणामुळे व्यापारी वर्ग त्रस्त असून, विद्यार्थ्यांच्या ये-जा करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. सदर रस्त्यासाठी वर्ष २०१९-२० मध्ये डांबरीकरणाचे काम मंजूर झाले होते आणि कंत्राटदारास कार्यारंभ आदेशही देण्यात आले होते. मात्र, एका व्यक्तीने भूसंपादन मावेजाच्या मागणीसंदर्भात विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दाद मागितल्यामुळे हे काम रखडले. जिल्हाधिकारी बीड यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे, २०१४ पूर्वी हा रस्ता जिल्हा परिषद बीडच्या अखत्यारीत होता, म्हणून भूसंपादनासाठी जिल्हा परिषद जबाबदार आहे. संबंधित प्रस्तावही बांधकाम विभाग क्र. १, जि.प. बीड मार्फत सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. ▶▶ उर्वरित पान २ वर

## मेडिकल - इंजिनियरिंग ची तयारी करणाऱ्या गरजु पन्नास विद्यार्थ्यांनां मोफत शिकवणी

## उद्धवजी ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांचा उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा शैक्षणिकदृष्ट्या आज ही मागास आहे. उच्च शिक्षणासाठी पर जिल्ह्याचा आधार घ्यावा लागतो ही शोकांतिक आहे, जिल्ह्यात विध्यार्थीरुपी गुणरत्नांची खान आहे. माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आर्थिकदृष्ट्या शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या परंतु मेडिकल अथवा इंजिनियरिंग ची तयारी करत असलेल्या अकरावी - बारावी च्या गरजु पन्नास विद्यार्थ्यांना मोफत वर्षभर शिकवणी देणार असल्याचा उपक्रम जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी जाहीर केला.

शेकडो विध्यार्थी आजही इच्छा असुन शिकवणी पासून दुर



आहेत. पालकांची बेरोजगारी, आर्थिक परिस्थिती नसणे या कारणांनी पाल्याची इच्छा असूनही नीट - जेईई च्या तयारी पासून लांब आहेत. अशा गरजु पन्नास विध्यार्थ्यांना राजस्थान कोटा येथील उच्चशिक्षित व प्रदीर्घ अनुभवी शिक्षकांच्या मार्गदर्शना खाली ▶▶ उर्वरित पान २ वर

# धनंजय मुंडेंच्या मंत्रीपदाला करुणा मुंडेंचा विरोध

## मंत्रीपद देण्याच्या अगोदर आमच्या कुटुंबाला विष द्या ! करुणा मुंडेंची अजित पवार यांच्याकडे मागणी !

**बीड । प्रतिनिधी**

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांना पुन्हा एकदा मंत्रिमंडळात सामावून घेण्याच्या चर्चेने जोर धरला आहे. धनंजय यांच्या दुसऱ्या पत्नी करूणा शर्मा मुंडे यांनी याला कडाडून विरोध केला आहे. अजित पवारांनी धनंजय मुंडे यांना पुन्हा मंत्रिपद देण्यापूर्वी आम्हाला विष द्यावे, असे त्या म्हणाल्यात.

मुंबई उच्च न्यायालयाने कृषि साहित्य खरेदी प्रकरणात धनंजय मुंडे यांना दिलासा दिला आहे. त्यानंतर अजित पवार यांनी त्यांना पुन्हा मंत्रिपद देण्याचे संकेत दिलेत. वाल्मीक कराड प्रकरणात धनंजय मुंडे यांना क्लीनचिट मिळाल्यानंतर विशेषतः त्यांचा त्या प्रकरणाशी संबंध नसल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्यांना पुन्हा मंत्रिपदावर संधी दिली जाईल, ▶▶ उर्वरित पान २ वर



### अजितदादा तुम्हाला जनतेचे दुःख दिसत नाही का ?

**करूणा शर्मा मुंडे म्हणाल्या की, अजित पवार बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. ते धनंजय मुंडे यांना पुन्हा मंत्रिपद देण्याची भाषा करत आहेत. ते लोकप्रतिनिधी आहेत. पण धनंजय मुंडे लोकप्रतिनिधी नाही. ते फक्त त्यांचा विचार करतात. जिल्ह्यात महादेव मुंडे व संतोष देशमुख हत्या प्रकरणासारख्या अनेक घटना समोर आल्यात. धनंजय मुंडे यांनी शासन व प्रशासनाचा गैरवापर करत जिल्ह्यात काळा कारभार व साम्राज्य पसरवले आहे. त्यानंतरही तुम्ही अशा घाणेरड्या व्यक्तीला मंत्रिपद देण्याची गोष्ट करत आहात का? तुम्हाला येथील जनतेचे दुःख दिसत नाही का? लोकप्रतिनिधी असताना त्यांनी महादेव मुंडे, संतोष देशमुख व माझ्या मुलाबाळांची काय अवस्था करून ठेवली होती हे इथे याऊन पाहा. तुम्हाला त्या माणसाविरोधात पुरावे हवे असतील तर मी देते. मला वेळ द्या. मी सर्व घेऊन येते. ते एकदा पाहा. त्यानंतर विचार करा. अशा घाणेरड्या व्यक्तीला मंत्रिपद देणे आम्ही सहन करणार नाही. त्यांना मंत्रिपद द्यायचे असेल तर प्रथम ज्ञानेश्वरी मुंडे, संतोष देशमुख यांच्यासह माझ्या अर्थात करूणा शर्माच्याही कुटुंबाला विष द्या. आम्ही सहन करणार नाही. त्यांना मंत्रिपद द्यायचे असेल तर प्रथम ज्ञानेश्वरी मुंडे, संतोष देशमुख यांच्यासह माझ्या अर्थात करूणा शर्माच्याही कुटुंबाला विष द्या.**



# देशाच्या शूर सैनिकांच्या बलिदानाच्या तुलनेत आपण कुठे आहोत?



देशाचे शूर सैनिक हे देशाचा अभिमान आहेत, जे देशाच्या रक्षणासाठी नेहमीच कर्तव्यपथावर तैनात असतात. कोणत्याही प्रकारची आपत्ती किंवा संकट आले तरी ते घाबरत नाहीत; कडक ऊन असो किंवा गोठवणारी थंडी असो, घनदाट जंगले असोत, उंच पर्वत असोत किंवा पावसाळी वादळ असोत, देशाचा सैनिक आपली भूमिका अतिशय चांगल्या प्रकारे बजावतो. अनेक परिस्थितीत, उपाशी आणि तहानलेले राहून, गैरसोयींशी झुंजून, मृत्यू समोर पाहूनही, ते सैनिक कधीही मागे हटत नाहीत, सैनिक कर्तव्याच्या आणि देशाच्या रक्षणासाठी शहीद होतात. देशाच्या शूर सैनिकांबद्दल आपल्याला जो आदर, सन्मान आणि अभिमान आहे, तोच आदर देशाच्या शूर सैनिकांनाही आपल्याबद्दल आहे का? देशात दररोज नवीन वाद आणि नवीन समस्या उद्भवताना दिसतात. गंभीर गुन्ह्यांचा आलेख इतका वेगाने वाढत आहे की लहान मुले देखील त्यात सक्रिय असल्याचे दिसून येते. आता, नातेसंबंधांना कलंकित करणाऱ्या घटना जवळजवळ दररोज पाहायला आणि ऐकायला मिळतात. लोकांसाठी आता माणुसकी, प्रतिष्ठा, शुद्धता, सत्यता, कर्तव्यनिष्ठा, विश्वासार्हता, सहिष्णुता, स्वाभिमान यासारखे शब्द त्यांचे मूल्य गमावून बसले आहेत आणि त्यांची जागा लोभ, द्वेष, आक्रमकता, फसवणूक, खोटेपणा, ढोंग, भ्रष्टाचार, खुशामत, अश्लीलता, देखावा, शब्द आणि कृतीतील तफावत आणि स्वार्थ यांनी घेतली आहे. प्रत्येकजण स्वतःच्या स्वार्थासाठी पर्यावरण, समाज आणि देशाचा विनाकारण नाश करण्याचा प्रयत्न करत आहे. देशातील लोकांची अशी परिस्थिती पाहून सीमेवर तैनात असलेल्या शूर सैनिकांना काय वाटत असेल? शूर सैनिकांसारखे जगण्याचा विचार कधी लोकांच्या मनात येत नाही का?

१९९९ च्या कारगिल युद्धात भारताने पाकिस्तानवर मिळवलेल्या विजयाच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस साजरा केला जातो. पाकिस्तानी सैन्याने ताब्यात घेतलेला भारतीय भूभाग परत मिळवण्यासाठी लढलेल्या भारतीय सैनिकांच्या शौर्य आणि बलिदानाचा हा दिवस सन्मान करतो. हा दिवस भारताच्या सार्वभौमत्वाचे आणि अखंडतेचे रक्षण करण्याच्या दृढनिश्चयाचे प्रतीक आहे. कारगिल विजय दिवस हा राष्ट्रीय अभिमानाचा आणि भावी पिढ्यांना शौर्य आणि बलिदानाच्या सत्यकथांनी प्रेरित करण्याचा दिवस आहे. देशातील असे विजय दिवस आपल्याला प्रत्येक क्षणी प्रेरणा देतात आणि देशाची सुरक्षा भारतीय सैनिकांच्या हातात सुरक्षित आहे याचा आपल्याला अभिमानही वाटतो. पण त्या तुलनेत, जेव्हा आपण आपल्या सभोवतालचे वातावरण पाहतो तेव्हा, आश्चर्य वाटते की आपल्यासारख्या स्वार्थी लोकांच्या रक्षणासाठी सैनिक सीमेवर इतका त्रास सहन करतो का?

५ वर्षांच्या निवडणुकांनंतर, नेते पुन्हा जनतेत जातात आणि अभिनय करायला लागतात आणि निवडणुका संपताच ते पूर्वीसारखे होतात. अनेक नेते निवडणूक प्रचारादरम्यान सामान्य लोकांच्या घरी, शेतात आणि कामाच्या ठिकाणी जाऊन त्या लोकांचा कामात मदत करताना माध्यमांमध्ये दिसतात. जनता भोळी म्हणावी की मूर्ख, ज्या नेत्याला जनता आपला प्रतिनिधी म्हणून निवडते आणि जनतेच्या कल्याणासाठी ५ वर्षांच्या कार्यकाळासाठी उच्च पदांवर बसवते, जर तो नेता योग्य धोरणांसह लोककल्याणकारी कामे करण्यात अपयशी ठरला तर त्याला निवडून देणारे लोक स्वतः त्या नेत्याकडून उत्तरे मागण्यास घाबरतात. आज किती लोक त्यांच्या नेत्याकडून, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा त्यांच्या क्षेत्रातील संबंधित लोकप्रतिनिधींना प्रश्न विचारतात किंवा उत्तरे मागतात? नेता जितका उच्च पदावर असेल तितका तो जनतेला जास्त जबाबदार असतो. जर देशाचे नेते शूर सैनिकांप्रमाणे पूर्ण प्रामाणिकपणा आणि देशभक्तीने त्यांच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये पार पाडत असतील तर देशात कोणतीही समस्या उद्भवणार नाही.

माझ्या आयुष्यातील एक छोटासा अनुभव आपण सर्वांसोबत शेअर करत आहे. मी महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना, राष्ट्रीय कॅडेट कॉर्प्सचा देखील विद्यार्थी होतो. त्या वेळी, आम्ही एनसीसी विद्यार्थी कॅम्पमध्ये जायचो आणि खूप काही शिकायचो. डिसेंबर-जानेवारीच्या थंडीत जंगलातील त्या कॅम्पमध्ये, प्रत्येक विद्यार्थ्याला रात्री २ तास तंबूबाहेर सुरक्षा ड्युटीवर लावायचे. मग पहाटे १ वाजले किंवा ३ वाजले तरी, विद्यार्थ्याला झोपेतून उठावे लागायचे, पूर्ण गणवेश घालून, तयार होऊन तंबूबाहेर संत्री म्हणून ड्युटी करावी लागायची. २५ किमी सतत जंगल ट्रेकिंग करणे, दररोज आपआपल्या तंबूच्या जमिनीवर शेणाचा लेप लावणे, किल्ला बनविणे, विविध स्पर्धांमध्ये भाग घेणे. पहाटे ५ वाजता उठणे, तयार होऊन रिपोर्टिंग करणे, तक्रार न करता दररोज आपले सर्व काम स्वतः करणे. वेळेवर नाश्ता, दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण उघड्या गवताळ जमिनीवर बसून करणे. दिवसभराच्या कामामुळे शरीर इतके थकून जायचे की झोपताच गाढ झोप येत असे. अगदी थोडीशी चुकीसाठी ही कठोर शिक्षा भोगावी लागायची. देशाच्या कानाकोपऱ्यातील विद्यार्थी त्यांच्या विविध कला आणि कौशल्यांचे प्रदर्शन करायचे. टीमवर्क, सद्भावना, देशभक्ती, तत्परता, निष्ठा, समर्पण, कठोर परिश्रम आणि शिस्त यांचा एक अनोखा संगम पाहायला मिळायचा आणि मला त्याचा भाग असल्याचा अभिमान वाटायचा. त्या दिवसांनी मला आयुष्यात खूप काही शिकवले. जीवनात नियम आणि शिस्त खूप महत्त्वाची आहे.

समस्यांचे मूळ समजून घेण्याऐवजी, लोक बाह्य स्वरूप पाहून किंवा खोट्या देखाव्यांना बळी पडून आणि स्वतःच्या कल्पना तयार करून समस्या वाढवतात. प्रत्येकासाठी दर्जेदार शिक्षण, प्रगत आरोग्य सुविधा आणि पात्रतेनुसार रोजगार किंवा व्यवसाय सेवा ही एका मजबूत देशाची वैशिष्ट्ये आहेत. आपल्या जीवनातील मूलभूत गरजांशी संबंधित समस्यांची जाणीव न ठेवता, आपण निरुपयोगी गोष्टींवर लक्ष केंद्रित करतो आणि आपापसात भांडतो, ज्यांचा आपल्या जीवनाशी काहीही संबंध नसतो. विश्वास बसत नाही पण आपल्या समाजात अशा घटना घडत आहेत जिथे ८- ११ वर्षांच्या मुलांना ४-५ वर्षांच्या चिमुकल्या मुलींवर बलात्कार केल्याचे आढळून येत आहे. अनेक पालकांना मुलांसोबत किंवा मुलांसमोर कसे वागावे हे देखील माहित नसते. मोबाईल, सोशल मीडिया आणि फॅशनने मुलांचे बालपण आणि निरागसता हिरावून घेतली आहे. शूर शहीद सैनिक, महापुरुष, क्रांतिकारी देशभक्त, समाजसुधारक, शूर राजे आणि सम्राटांच्या प्रेरणादायी गाथा जाणून घेण्याऐवजी, आजकाल आपण चित्रपट तारे, ऑनलाइन गेम, टाईमपास मनोरंजन, अश्लीलता पाहण्यात आणि जाणून घेण्यात आपला मौल्यवान वेळ वाया घालवतो. फक्त जिभेच्या लालसेपोटी लोक अस्वास्थ्यकर अन्न पसंत करतात. मानवी आळस, व्यसन, प्रदूषण आणि भेसळ यामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य कमकुवत झाले आहे, पण लोक याला महत्त्व देत नाहीत, जी सर्वात महत्वाची गोष्ट आहे.

स्वातंत्र्य दिन आणि प्रजासत्ताक दिनासारख्या दिवसासाठी सामान्य लोकांमध्ये देशभक्ती जागृत होते. आपण खूप तिरंगी झंडे खरेदी करतो आणि फिरतो, रॅली काढतो, देशभक्ती गाण्यांमध्ये मग्न होतो, खूप आनंद घेतो आणि दुसऱ्या दिवशी आपल्याला ते तिरंगा आपल्या आजूबाजूच्या रस्त्यांवर, कचऱ्यात, सर्वत्र वाईट स्थितीत पडलेले आढळतात. देशाच्या तिरंगा ध्वजाला इतके स्वस्त बनवू नका की त्याच्याशी खेळण्यासारखे खेळल्यानंतर तो दुसऱ्या दिवशी कचऱ्यात सापडेल. ध्वजाची किंमत पैशात नाही तर सन्मानात आहे, ज्याची काहीही किंमत असू शकत नाही, ते अनमोल आहे. या राष्ट्रीय झेंड्याचा रक्षणासाठी आणि सन्मानासाठी एक शूर सैनिक आपले प्राण अर्पण करतो, मग त्या सैनिकाच्या तुलनेत आपण कुठे आहोत? कोणत्या परिस्थितीत, किती त्याग, संघर्ष आणि बलिदानानंतर आपल्याला स्वातंत्र्याचा हा दिवस साजरा करायला मिळाला, याची जाणीव कधी आपल्या मनाला होते का? स्वातंत्र्यासाठी, असंख्य लोकांनी आपले सर्वस्व गमावले जेणेकरून आपण हा दिवस पाहू शकू. देशातील प्रत्येक नागरिक, मग तो नेता असो वा सामान्य कर्मचारी, मालक असो वा नोकर, व्यापारी असो वा कामगार, प्रत्येकाने आपल्या आयुष्यातील काही वर्षे सैनिक म्हणून देशाची सेवा करण्यासाठी दिली पाहिजेत, जेणेकरून आपण सर्वांना शिस्त, देशभक्ती आणि कर्तव्यनिष्ठेचा खरा अर्थ समजेल.

**लेखक – डॉ. प्रीतम भी. गेडाम**

## वकीलाचे मन

पुर्वेचा सूर्य पश्चिमेला, कधी उगवणार नाही
वकीलाचे मन कुणास, कधी कळणार नाही!!
सुरुवातीचे पाच वर्षे, असे प्रतिक्षेचा काळ
मग हळू-हळू जुळते, या व्यवसायाशी नाळ
जीवनातील हा संघर्ष, कधी संपणार नाही !!
ढिगभर कागदपत्रांचे, करावे लागते वाचन
सर्वोच्च न्यायनिर्णयांचे, करीतसे अवलोकन
लौकीकान्वये मानधन, कधी मिळणार नाही !!
ऑफीस-कोर्ट-ऑफीस, करून कुणा नसे जाण
पक्षकारांच्या केसेसचा, वकीलांवरच असे ताण
वेळ स्वतःच्या आयुष्यास, कधी गावणार नाही !!
पगार नसे, पेन्शन नसे, मानधनावरच समाधान
केवळ आशेवरच रंगवतो, भविष्याचे सुस्वप्न छान
दुःख स्वमनाचे कुणास, कधी दावणार नाही !!
लोकांच्या न्यायासाठी, नेहमी लढत तो असतो
मुखावर हास्य ठेवून, मनातच कुढत असतो
स्वतःच्या हक्कांसाठी, कधी लढणार नाही!!
कोर्टातील महत्वाचा, वकील सहकारी आहे
न्यायाधिशांप्रमाणेच तो, न्यायिक अधिकारी आहे
दर्जा सुविधांचा त्यास, कधी लाभणार नाही !!
पुर्वेचा सूर्य पश्चिमेला, कधी उगवणार नाही
वकीलाचे मन कुणास, कधी कळणार नाही!!

**– ॲड. मुकुंदराव जाधव, जळगांव.**

◆ पान ४ वरून पुढे...

## जोपर्यंत चंद्र...

व्यापारी, पत्रकार ,विद्यार्थी,नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार सुरेश धस म्हणाले , ३ मे १९९९ रोजी सुरू झालेल्या या युद्धात भारतीय लष्कराने 'ऑपरेशन विजय' अंतर्गत ८५ दिवसांच्या संघर्षानंतर २६ जुलै १९९९ रोजी टायगर हिलवर तिरंगा फडकवून विजय प्राप्त केला. या लढ्यात ५२७ भारतीय जवानांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. यामध्ये कॅप्टन विक्रम बत्रा, लेफ्टनंट संदीप उन्नीकृष्णन, ग्रेनेडियर योगेंद्र सिंह यादव यांसारख्या वीरांनी अतुलनीय शौर्य गाजवले.याच युद्धात पाटोदा तालुक्यातील शहीद सुभाष सानप यांनी देशासाठी प्राणार्पण केले. त्यांचे बलिदान संपूर्ण बीड जिल्ह्यासाठी गौरवाची आठवण आहे.भारतीय जवान देशाच्या सीमारेषांवर रात्रंदिवस सज्ज असून त्यांच्या त्यागामुळेच देशात शांतता आणि विकास नांदतो, हे विसरता कामा नये. शहीद सुभाष सानप यांच्या बलिदानाचा गौरव करताना उपस्थितांनी अश्रुपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी आजी माजी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अंकुश खोटे बोलताना म्हणाले की, तब्बल ६६ दिवस भारत मातेच्या शुर वीरांनी रात्र दिवस झुंज देऊन आपल्याला कारगील विजय मिळून दिला. २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवस म्ह्णून आज आपण साजरा करत आहोत. आजच्या तरुणांईला यावेळीच्या पराक्रमाची जाणीव होण्यासाठीचा हा उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी अभिनेते तथा व्याख्याते विक्रम जगताप म्हणाले, सैनिकांचे पराक्रम आणि त्याग आपले लोक लगेच विसरून जातात.सैनिक आणि

◆ पान ४ वरून पुढे...

त्यांचा त्याग या गोष्टीचे महत्व आपल्या लोकांना जोपर्यंत कळत नाही तोपर्यंत जाणीव होणार नाही. आपल्या सीमेवर काम करणाऱ्या प्रत्येक सैनिकाला आपल्या कर्तृत्वाची जाणीव असल्याने तो आपलं कर्तव्य बजावत आहे तो पैशासाठी काम करत नाही. तो देश सेवा करण्याचं ध्येय ठेवूनच आपले कर्तव्य सीमेवर करत असतो असे सांगत त्यांनी आपल्या व्याख्यानातून कारगील युद्धाचा थरार आपल्या शब्दात उपस्थितांना सांगितला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुकर गळगटे यांनी केले. यावेळी संघटनेचे संघटनेचे अध्यक्ष अंकुश खोटे, जमीर पठाण, संजीव फसले, नवनाथ भगत ,श्रीराम माने, हनुमान झगडे, बबन दहिफळे,गोरख काळे,मनीष नरोडे, विष्णू पवार,दिलीप मराठे ,दादासाहेब ठोंबरे, संजय गायकवाड आदींनी हा कार्यक्रम घेण्यासाठी परिश्रम घेतले.

## कारगिल युद्धातील...

प्रत्यक्ष सहभागी असलेल्या योध्यांनी कारगिल युद्धातील आपले अनुभव कथन केले. विविध प्रसंग उभे केले. आपल्या अनुभवातून त्यांनी उपस्थितांना कारगिल युद्धातील विविध प्रसंग सांगितले. या प्रसंगी उपस्थित महिला, पुरूष यांचे डोळे भरून आले, मन गहिवरले, प्रारंभी संस्थेचे सचिव व कारगिल युद्धामध्ये प्रत्यक्ष सहभागी असलेले माजी सुभेदार आबासाहेब रंगनाथ हाके यांनी कारगिल युद्धाबाबतची माहिती उपस्थितांना दिली. तर संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन पांडुरंग शेप यांनी कारगिल युद्ध का, कसे व कोणत्या कारणामुळे घडले. हे सांगून कठीण परिस्थितीत भारतीय सैन्याने आपले मनोधैर्य न खचू देता शत्रुशी दोन हात केले., प्रखर

◆ पान ४ वरून पुढे...

लढा दिला व शौर्याचे धाडस दाखवून विजय संपादन केला. ही गाथा म्हणजे कारगिल विजय दिवस होय. या युद्धात शौर्य गाजविणाऱ्या सर्व भारतीय सैनिकांना अभिवादन करीत असल्याचे कॅप्टन पांडुरंग शेप यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमास उपस्थित सर्वांचे आभार संस्थेच्या वतीने मानण्यात आले.

## बेकायदेशीर गावठी...

त्याच्या कमरेला असलेल्या गावठी पिस्टल सह ताब्यात घेऊन अटक करण्यात आली असता सदर प्रकरणात बीड ग्रामीण पोलीस स्टेशन येथे कलम ३,२५ शस्त्र अधिनियम १९५९ प्रमाणे आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यात आरोपीस मा.मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब, बीड याच्या न्यायालयात हजर करण्यात आले असता सदर प्रकरणात आरोपीच्या वतीने ॲड.अजित ओव्हाळ यांनी काम पहिले असता सदर प्रकरणात आरोपीच्या बाजूने जामिन अर्ज दाखल करण्यात आला त्यात सरकार पक्ष्या च्या बाजूने युक्तिवाद करण्यात आला व आरोपीच्या बाजूने ॲड.अजित ओव्हाळ यांनी भक्कम पणे युक्तिवाद केला असता मा.मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब, बीड यांनी दोन्ही बाजू समजून घेतल्या असता आरोपीस मा.मुख्य न्यायदंडाधिकारी साहेब,बीड यांनी आरोपीस जमीन मजूर केला सदर प्रकणात आरोपीच्या बाजूने ड.अजित ओव्हाळ काम पहिले असता त्याना ऍड.डी.ए.ससाणे यांनी मार्गदर्शन केले असून ऍड.एन.जी.जाधव यांनी ही सहकार्य केले आहे.

◆ पान 9 वरून पुढे...

## "मंत्रिपदासाठी ...

स्थान द्यायचं नाही, असं पक्षाने ठरवल्याचं दिसतय. सोळंके पुढे म्हणाले, पक्षाचा इतिहास मला माहिती आहे. बीड जिल्हा हा राष्ट्रवादी काँग्रेसचा समर्थक राहिलेला आहे. मागील अनेक निवडणुकीचे दाखले देता येतील. केवळ आणि केवळ मराठा समाजाने राष्ट्रवादीला खांबीर पाठिंबा दिलेला आहे. परंतु मंत्रिपद देताना मात्र कायम ओबीसींना आणि इतरांना संधी दिली जाते. शरद पवारांनीही तेच केलं आणि अजित पवारही तेच करत आहेत. मराठा समाजाकडे ढुंकूनही बघितलं जात नाही, ही वस्तूस्थिती आहे. हे माझे अनुभवाचे बोलत आहेत. अशा शब्दात त्यांनी स्वपक्षावर ताशेरे ओढले. धनंजय मुंडेंच्या मंत्रिपदाच्या संकेतांवर सोळंके म्हणाले, अजित पवारांनी काय संकेत दिले आहेत हे मला माहिती नाही. परंतु ते आमच्याच पक्षाचे आमदार आहेत, माझ्या शेजारचा त्यांचा मतदारसंघ आहे. त्यामुळे मी त्यांना शुभेच्छा देतो. धनंजय मुंडेंना मिळलेल्या क्लिनचीटवर सोळंके म्हणाले, त्याबाबतीत माझे जे काही मत आहे ते मी पक्षश्रेष्ठींना कळवणार आहे. महादेव मुंडे प्रकरणावर सोळंके म्हणाले. खून प्रकरणात नवनवीन माहिती पुढे येत आहे. २० महिने झाले तरी आरोपी निष्पन्न होत नाहीत. अजूनही वेळ गेलेली नाही. नवीन माहितीच्या आधारे पोलिसांनी गुन्हे दाखल करणं गरेजचं आहे.

## माझ्यासमोर बसलेल्या...

याला स्वीकारले पाहिजे, दोघांनी पत्र लिहिणे ही चूक आहे. फोन करून किंवा भेटून बोलले पाहिजे होते. रेकॉर्डवर पत्र लिहिणे हे योग्य नाही.

कॅबिनेट मंत्र्यांना आपले अधिकार राज्यमंत्र्यांकडे असावे असे वाटत नाही. संजय शिरसाठ यांनी आपल्या विभागाच्या सचिवाला सांगायला पाहिजे होते. धनंजय मुंडे यांच्याबद्दल बोलताना अंबादास दानवे म्हणाले, कृषी विभागात नैतिकदृष्य घोटाळा झालेला आहे. मी रोहित पवारांना सल्ला देईल, फोन टॅप केला तर होऊ द्या, आपण काही करीतच नाहीत. लाडकी बहीण योजनेबद्दल बोलताना ते म्हणाले की, निवडणुकीच्या काळात निवडणुकीसाठी ही योजना करण्यात आली आहे. आता समोर येत आहे पुरुषांनी लाभ घेतला. हा सर्व प्रकार गंभीर आहे, याची चौकशी झालीच पाहिजे. संजय राऊत यांनी केलेल्या विधानाबद्दल बोलताना अंबादास दानवे म्हणाले, राज्यातील मंत्र्यांना काही महत्व नाही सर्व कारभार मुख्यमंत्री घेत आहेत. आताचे सर्व मंत्री पुतळ्यासारखे फक्त मुखावटे आहेत. या सरकारने परमवीर सिंह यांना पुरावा नसताना कारवाई केली. सरकारला एवढी साथ दिली. आता त्यांना क्लिनचिट मिळणे ही काही बातमी होऊ शकत नाही.

◆ पान 9 वरून पुढे...

महिला मारहाण प्रकरणाबद्दल बोलताना म्हणाले, महिलेचे फोटो पाहिले अतिशय वेदनादायक आहे. एखाद्या महिलेला ह्या पद्धतीने मारहाण करणे गंभीर आहे. जर पोलिसांनी कारवाई केली नाही तर पोलिसांविरोधात आम्ही तक्रार देऊ.

## मुंडेंच्या मंत्री...

करण्यात आली होती. एका पवनचक्की प्रकल्पातील खंडणीच्या प्रयत्नाला विरोध केल्यामुळे ही हत्या झाली होती. या प्रकरणाने राष्ट्रीय पातळीवर संताप व्यक्त करण्यात आला होता. या प्रकरणात धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराड यांना अटक झाल्यानंतर, विरोधी पक्षांनी आणि सत्ताधारी महायुतीच्याही काही नेत्यांनी परळीच्या या आमदाराला मंत्रिमंडळातून वगळण्याची जोरदार मागणी केली होती. मुंडे यांनी या वर्षी ४ मार्च रोजी राजीनामा दिला होता. राज्य नेतृत्व हिंसेचे उदात्तीकरण करत आहे आणि अशा व्यक्तींना मंत्रिपदाचे बक्षीस देत आहे, असे जरांगे यांनी अंतरवाली सराटी गावात पत्रकारांना सांगितले. या विषयावर बोलताना जरांगे यांनी महादेव मुंडे यांच्या हत्येचाही उल्लेख केला. परळी येथील रहिवासी महादेव मुंडे यांचे १९ ऑक्टोबर २०२३ रोजी अपहरण करण्यात आले होते आणि तीन दिवसांनंतर त्यांचा मृतदेह सापडला होता. गुन्हेगारांना अटक करण्यात होणाऱ्या दिरंगाईचा निषेध म्हणून त्यांच्या पत्नीने गेल्या आठवड्यात बीडच्या पोलीस अधीक्षक कार्यालयात विष प्राशन केले होते. जरांगे म्हणाले, महादेव मुंडे यांच्या कुटुंबाचे सांत्वन करण्याऐवजी, सरकार धनंजय मुंडे यांना बक्षीस देत आहे. जर राज्य सरकार अशा पद्धतीने काम करत राहिले, तर महाराष्ट्रात कायदा आणि सुव्यवस्था शिल्लक राहणार नाही.

## महाराष्ट्रातील 7...

कोणाकोणाला मिळाला संसदरत्न पुरस्कार ? भाजपच्या स्मिता वाघ, शिंदे गटाचे नरेश म्हस्के, कॉंग्रेसच्या वर्षा गायकवाड, भाजपच्या मेधा कुलकर्णी, प्रवीण पटेल, विद्युत बरन महतो, दिलीप सेकिया यांना पुरस्कार मिळाला आहे. तर खासदार एनके प्रेमचंद्रन यांना पाचव्यांदा संसदरत्न पुरस्कार मिळाला आहे.

कोणत्या राज्यातून कोणाला पुरस्कार?महाराष्ट्र – स्मिता वाघ, अरविंद सावंत, नरेश म्हस्के, वर्षा गायकवाड, मेधा कुलकर्णी, सुप्रिया सुळे, श्रीरंग आप्पा बारणे

## भर पावसात...

◆ पान 9 वरून पुढे...

मात्र, प्रकरण उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात प्रलंबित असल्यामुळे काम पूर्णतः थांबवण्यात आले आहे. यासंदर्भात वंचित बहुजन आघाडी बीडच्यावतीने जिल्हाधिकारी, बीड नगरपरिषद व संबंधित लोकप्रतिनिधींच्या भूमिकेवर गंभीर आरोप करण्यात आले आहेत. नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

प्रमुख मागण्या पुढे अशा मांडण्यात आल्या आहेत : रस्त्याचे काम थांबवण्यामागील नेमके कारण व न्यायालयीन प्रकरणाची माहिती जाहीर करावी, भूसंपादनाचा वाद तातडीने निकाली काढावा, उच्च न्यायालयात प्रलंबित प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न व्हावेत, डांबरीकरणाचे काम त्वरित सुरू करावे. सदर मागण्यांकडे प्रशासन व लोकप्रतिनिधींकडून सतत दुर्लक्ष झाल्यामुळे वंचित बहुजन आघाडी बीडच्या वतीने होडी चलाव आंदोलन व खड्ड्यांचे नामकरण सन्मान सोहळा धानोरा रोड परिसरात आयोजित करण्यात आला. या आंदोलनात व्यापारी, विद्यार्थी, महिला आणि नागरिकांचा मोठा सहभाग दिसून आला.

नागरिकांच्या जिवीत सुरक्षिततेशी खेळणाऱ्या प्रशासनाच्या उदासीनतेचा निषेध करत आंदोलनात अनेकांनी रस्त्यावरील खड्ड्यांना नावं देत प्रशासनाच्या निद्रिस्त कारभारावर बोट ठेवलं. आता हे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येणार असल्याची माहिती वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष पुरुषोत्तम वीर, सहसंघटक अर्जुन जंजाळ, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख राजेश कुमार जोगदंड, सम्यक विद्यार्थी आंदोलनाचे जिल्हाध्यक्ष रोहन मगर, महिला जिल्हा उपाध्यक्ष पुष्पाताई तुरुकमाने, ता.किरण वाघमारे, शहराध्यक्ष लखन जोगदंड, संदीप जाधव, आकाश साबळे, शेख पाशाभाई, प्रकाश उजगरे, प्रदीप खळगे, राजाभाऊ घोषीर, सतीश क्षीरसागर, अभिजित बनसोडे, आप्पा पवार, मिलिंद सरपते यांच्यासह व्यापारी, शाळकरी विद्यार्थी यांनी सहभाग नोंदवला आहे.

खड्ड्याला दिले खासदार आमदाराचे नाव- धानोरा रोडचे डांबरीकरणाचे काम तात्काळ पोलीस बंदोबस्तामध्ये करण्यात यावे या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने होडी चलाव आंदोलन करण्यात आले तसेच रस्त्यावरील खड्ड्यामध्ये तलावाचे स्वरूप आल्याने एका खड्ड्याला खासदार बजरंग बप्पा सोनवणे खड्डा, दुसऱ्या खड्ड्याला आमदार संदीप क्षीरसागर खड्डा आणि तिसऱ्या खड्ड्याला मुख्याधिकारी नीता अंधारे खड्डा असे नामकरण केले आहे. लवकरच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित दादा पवार व जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांचेही नाव खड्ड्याला देण्यासाठी धानोरा

◆ पान 9 वरून पुढे...

रोडला व्यापक बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी सांगितले.

## मेडिकल - इंजिनियरिंग ची...

संपूर्ण वर्षभर मोफत शिकवणी दिली जाणार असल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.

अशा गरजु विद्यार्थ्यांनी व पालकांनी ३१जुलै पर्यंत बीड शहरातील बस स्थानकामागे असणाऱ्या जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या संपर्क कार्यालयाशी संपर्क साधुन पूर्व नोंदणी अर्ज भरून द्यावयाचा आहे. अधिक माहितीसाठी पालकांनी ९१५८९६३७३७ या क्रमांकाशी संपर्क साधावा.

## धनंजय मुंडेंच्या...

असे ते म्हणालेत. या पार्श्वभूमीवर करूणा शर्मा मुंडे यांनी अजित पवारांकडे आपल्याला विष देण्याची मागणी केली आहे.धनंजय मुंडे यांच्याऐवजी इतर कोणत्याही चांगल्या माणसाला मंत्रिपद द्या. कारण, धनंजय यांना मंत्रिपद देणे हे महाराष्ट्रातील जनता सहन करणार नाही. धनंजय यांच्यासह त्यांचे कार्यकर्ते अजूनही माजलेलेच आहेत, असेही करूणा शर्मा यावेळी बोलताना म्हणाल्या.

धनंजय मुंडेंचा विश्वासू वाल्मीक कराडवर मकोका

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी निघृण हत्या करण्यात आली. या प्रकरणी माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा विश्वासू वाल्मीक कराड याला अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर मकोका अंतर्गतही कारवाई करण्यात आली आहे. सध्या तो सध्या बीड जिल्हा कारागृहात खडी फोडत आहे. त्याला तिथे व्हिआयपी ट्रिटमेंट मिळत असल्याचा आरोप केला जातो. सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार धनंजय मुंडे यांना पुन्हा एकदा मंत्रिमंडळात सामावून घेण्याच्या चर्चेने जोर धरला आहे. धनंजय यांच्या दुसऱ्या पत्नी करूणा शर्मा मुंडे यांनी याला कडाडून विरोध केला आहे. अजित पवारांनी धनंजय मुंडे यांना पुन्हा मंत्रिपद देण्यापूर्वी आम्हाला विष द्यावे, असे त्या म्हणाल्यात.

मुंबई उच्च न्यायालयाने कृषि साहित्य खरेदी प्रकरणात धनंजय मुंडे यांना दिलासा दिला आहे. त्यानंतर अजित पवार यांनी त्यांना पुन्हा मंत्रिपद देण्याचे संकेत दिलेत. वाल्मीक कराड प्रकरणात धनंजय मुंडे यांना क्लीनचिट मिळाल्यानंतर विशेषतः त्यांचा त्या प्रकरणाशी संबंध नसल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्यांना पुन्हा मंत्रिपदावर संधी दिली जाईल, असे ते म्हणालेत. या पार्श्वभूमीवर करूणा शर्मा मुंडे यांनी अजित पवारांकडे आपल्याला विष देण्याची मागणी केली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# शासकीय आयटीआय आष्टी येथे माजी सैनिक व वीर मातांचा विजय दिवस निमित्त सन्मान

**कडा । प्रतिनिधी**

श्री गुरुलिंग स्वामी जीबकाटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आष्टी येथे दिनांक २६ जुलै रोजी मंत्री श्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून 'विजय दिवस' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात माजी सैनिक, वीर माता व वीर पत्नी यांचा शाल व मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध देशभक्तीपर स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धक विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे



अध्यक्षस्थान माजी सैनिक श्री कैलास रेडकर फौजी यांनी भूषवले, तर प्रमुख वक्ते म्हणून शिल्प निदेशक श्री ज्ञानेश्वर दहिफळे, श्री भीमराव घागडे आणि श्री खामकर फौजी यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य श्री गणेश हडतगुणे यांनी केले.या वेळी ८६ वर्षीय माजी सैनिक श्री खामकर फौजी यांनी उपस्थितांना त्यांच्या चार युद्धांतील अनुभव सांगितले. त्यांनी युवांना निर्व्यसनी राहण्याचे, देशासाठी सदैव सज्ज राहण्याचे आणि शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहण्यासाठी नियमित व्यायाम करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमात उपस्थित वीर पत्नी केसरबाई अश्रुबा राऊत व संगीता ताई घोलप यांचा विशेष सन्मान करण्यात आला.तसेच पुढिल प्रमाणे माजी सैनिकांचा मान्यवर म्हणून गौरव करण्यात आला. श्री राजू जगदाळे, श्री भीमराव वालेकर, श्री रघुनाथ खोले, श्री दामोदर चव्हाण, श्री जालिंदर धोंडे, श्री धनंजय गावडे, श्री भाऊसाहेब भोसले, श्री मधुकर बांबदाळे, श्री अर्जुन गळगटे, श्री नारायण झगडे, श्री प्रल्हाद तोडकर, श्री प्रल्हाद आजबे, श्री गोरख पवार, श्री अरुण शेंडगे, श्री गोरख धनवडे, श्री सोपान कोकणे, श्री प्रमोद गळगटे, रहमान पठाण, श्री लक्ष्मण जगताप, श्री गोवर्धन तरटे, श्री विकास मस्के, श्री रमेश डिडुळ, श्री भाऊसाहेब नाकाडे, श्री वाहिद खान, श्री काझी साहेब यांचा समावेश होता. यावेळी आयटीआय संस्था व्यवस्थापन समितीचे सदस्य श्री अक्षय शिरस्वाल, महात्मा गांधी विद्यालय आष्टीचे सायकड सर व नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री विलास डोके सर तसेच कार्यक्रमास बहुसंख्येने विद्यार्थी, शिक्षकवर्ग व नागरिकांची उपस्थिती लाभली. देशप्रेम व शौर्याचे स्मरण करून देणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील सर्व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले

# श्रावण मासानिमित्त भालचंद्र गणपती मंदिरांची भक्तांकडून स्वच्छता मोहीम; विना उभारण्यात आला: डॉ.गणेश ढवळे





**लिंबागणेश । प्रतिनिधी**

श्रावण महिना अध्यात्माचा,मन:शुद्धीचा पावित्र्याचा आणि व्रतवैकल्याचा संस्कृतीचे मोठे महत्त्व म्हणून ओळखला जातो. ऊन पावसाचा लपंडाव खेळणारा, इंद्रधनुष्याची कमान बांधणारा,हिरवाईचा गालिचा अंथरुणारा व्रतवैकल्याने सात्विकतेचा सडा शिंपणारा, निसर्गाची समृद्धी उधळणारा श्रावण महिना आज दि.२५ शुक्रवार पासुन सुरु झाला असुन २३ आगस्ट पर्यंत श्रावणाचा बहर सुरू राहणार आहे.सण उत्सव, व्रतवैकल्याची मांदियाळी घेऊन आलेल्या या हिरव्या ऋतुच्या स्वागतासाठी प्रत्येक जण आतुर झाला आहे. धार्मिक विधी,सण यांची रेलचेल असल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आपल्या संस्कृतीत या महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व असुन यानिमित्ताने महादेव मंदिरासह सर्वंच मंदिरांमध्ये भाविकांची दर्शनासाठी,पुजा,अर्चा करण्यासाठी गर्दी होते. आपण नतमस्तक होणारा परीसर स्वच्छ असायला हवा यासाठी श्रावण महिन्यात गावातील सर्वच मंदिरांची स्वच्छता करताना पहावयास मिळते. मंदिराच्या स्वच्छतेसाठी भाविक, तरूण मंडळी, वारकरी सगळेच आघाडीवर असतात.

आज बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिर, हनुमान मंदिर, खंडोबा मंदिर, श्रीकृष्ण मंदिर आदी मंदिराची स्वच्छता करण्यात आली. स्वच्छता मोहीमेत दगडु कांबळे,गणपत दाभाडे, कल्याण वाणी,शिवाजी वाणी, वरद जोशी,अभिजित गायकवाड,सुरज भोसले,अक्षय आबदार, रोहित भोसले कमलाकर जाधव,सचिन भोसले,विवेक भोसले, हरिओम क्षीरसागर आदि सहभागी झाले होते.

श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिरात परंपरागत विना उभारण्यात आला. प्रति वर्षाप्रमाणे लिंबागणेश येथील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती मंदिरात परंपरागत विना उभारण्यात आला. सर्वप्रथम भजणी मंडळी व भाविकांच्या उपस्थितीत गणपती पुजन , नवग्रह पुजन व ग्रंथराज पुजन करून विना उभारण्यात आला.यावेळी देवस्थान विश्वस्त, पुजारी आणि भाविक मंडळी उपस्थित होती. महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

# केवळ दोन वर्षांचे वय पूर्ण होण्यापूर्वीच जागतिक कीर्तीचा मान: ध्रुव युवराज चरखा याची वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील चिमुकला ध्रुव युवराज चरखा याने केवळ दोन वर्षांचे वय पूर्ण होण्यापूर्वीच आपली असामान्य बुद्धिमत्ता सिद्ध करत वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये आपले नाव कोरले आहे. लहान वयात मिळवलेला हा विक्रम संपूर्ण जिल्ह्यासाठी गौरवाचा विषय ठरत आहे.

सध्या ज्या वयात लहान मुले टीव्ही, मोबाइल गेम्स, यूट्यूब आणि सोशल मीडियामधील व्हिडीओ, रिल्स पाहण्यात अधिक रममाण असतात, त्या वयात ध्रुवने मराठी व इंग्रजी भाषेतील महिने, अंक, आठवड्याचे दिवस, विविध



श्लोक, देशांचे झेंडे, प्राणी, पक्षी, भाज्या, फळे व दिशा अचूक ओळखण्याची क्षमता विकसित केली आहे. तसेच पाढे सांगण्याचे कौशल्यही त्याने लहान वयातच आत्मसात केले आहे.

ध्रुवने दीड वर्षांचे असतानाच विविध गोष्टी बोलून दाखवण्यास सुरुवात केली होती. पालकांच्या मार्गदर्शनाखाली, कमी स्क्रीन टाईम, संतुलित आहार, कौटुंबिक संवाद आणि सततच्या उत्तेजनामुळे त्याने हळूहळू अधिकाधिक ज्ञान आत्मसात केले. त्याच्या या उल्लेखनीय प्रगतीची दखल घेऊन वर्ल्ड वाईड बुक ऑफ रेकॉर्ड संस्थेमार्फत त्याची अधिकृत नोंद करण्यात आली आहे.

ध्रुवच्या या यशामागे पालकांचे सातत्य, योग्य दिशा आणि स्वयंप्रेरणेने अभ्यास करण्याची त्याची वृत्ती आहे. त्याच्या या बालकामगिरीने बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. ध्रुव युवराज चरखा याच्या या जागतिक कीर्तीच्या विक्रमाबद्दल जिल्ह्यातून तसेच विविध स्तरांमधून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत असून, त्याच्याकडून भविष्यात आणखी यशस्वी कार्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मोमीनपुरा परिसर येथील सिमेंट रस्ता व नाली कामांचे उद्घाटन शेख निजाम यांच्या प्रयत्नास यश

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील अल्पसंख्यांक बहुल भागातील महत्त्वपूर्ण असा पेठ बीड विभागातील मिल्लत नगर, मोहम्मदया कॉलनी, बीड मामला, ढगे कॉलनी भागामध्ये मागील अनेक वर्षापासून रस्ते नाली नसल्यामुळे खुप त्रास सहन करावा लागला, सदरील बाब त्या भागातील लोकांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शेख निजाम यांच्या कानावर घातली असता त्यांनी पालकमंत्री बीड जिल्हा अजित दादा पवार माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित आमदार विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून सदरील भागातील रस्ते व नाल्यांचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवला या झालेल्या विकास कामांचे लोकार्पण व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या सत्काराचे आयोजन बीड राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व शेख निजाम मित्र मंडळ यांच्यातर्फे दिनांक २७ जुलै २०२५ सायंकाळी ठीक ७ वाजता करण्यात येणार असून यावेळी सदरील कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून गेवराई विधानसभेचे आमदार विजयसिंह पंडित शेख निजाम यांच्या प्रमुख उपस्थिती राहणार असून सदरील विकास कामांचे लोकार्पण व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या सत्कार समारंभास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मिल्लत नगर मोहम्मद कॉलनी भागाचे माजी नगरसेवक हाफिज अशपाक ,मोमीन जुबेर, सत्तार भाई इनामदार, सय्यद आजम, शेख कदीर, शेख जाकीर, शेख नसीर शेख हमीद, शेख सर्फराज, आदींनी केले आहे.

**अवसायक नारायणगड नागरी सहकारी पतसंस्था म. बीड ता. जि. बीड तथा मुख्य लिपीक संलग्न सहायक निबंधक, सहकारी संस्था ता. पाटोदा**

**विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांसाठी)**

**नोटीस दिनांक १७.०७.२०२५**

नारायणगड नागरी सहकारी पतसंस्था म. बीड ता. जि. बीड या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की आपली संस्था मा. उपनिबंधक सहकारी संस्था ता.बीड यांनी अंतीम अवसायनाचे आदेश निर्गमित करुन सदर संस्था अवसायनात घेवून अवसायक पदी माझी नियुक्ती केली आहे. संस्थेच्या सभासदांनी संस्थेचे कलम १९ व नियम १८ अन्वये पुनर्जिवन करणे बाबत विनंती अर्ज अवसायक यांना दिलेला आहे.

म्हणून आपल्या संस्थेचे पुनर्जिवन करण्याबाबत निर्णय घेण्यासाठी संस्थेच्या सभासदांची दिनांक ०२.०८.२०२५ रोजी संस्थेच्या कार्यालयात विशेष सर्वसाधारण सभा दुपारी ०१.०० वा घेण्यात येणार असून, सदर सभेत खालील विषयावर चर्चा करण्यात येणार असून सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे हि विनंती.

• **सभेपुढिल विषय –**

१. मागील सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे.
२. संस्थेच्या पुनर्जीवनासाठी मा. उपनिबंधक सहकारी संस्था ता. बीड यांचेकडे नमुना ह मध्ये अर्ज करणे.

**स्वाक्षरीत**
**(एस.एल.बेटकर)**
**अवसायक नारायणगड नागरी सहकारी पतसंस्था म. बीड ता. जि. बीड तथा मुख्य लिपीक संलग्न सहायक निबंधक, सहकारी संस्था ता. पाटोदा**

**मा. ॲड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर**

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्ट 2002 व अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** दि. 23/07/2025

अर्जदार : श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को-ऑप.क्रैडीट सोसायटी लि. माजलगाव ता. माजलगाव जि. बीड

**विरूद्ध - गैरअर्जदार**

1) क्र. 01/2025 1) पवार लताबाई सुभाष 2) सुमैया अलिम शेख 3) आयेशा अय्याज देशमुख 4) राजुबाई आत्माराम वगरे 5) शेख सुलताना शेख रहेमत 6) हालिमाबी राजु देशमुख 7) संजिवनी पांडुरंग ढेरे 8) शेख वासीरा शेख कदीर सर्व रा. घुंसी पो. मच्छिंद्र चिचोली ता. घनसावंगी जि. जालना
2) ल. क्र. 02/2025 1) शेख रुक्सानबी बकतर 2) राजुबाई आत्माराम वगरे 3) पवार लताबाई सुभाष 4) हालिमाबी राजु देशमुख 5) संजिवनी पांडुरंग ढेरे 6) शेख बसीरा कदीर 7) आव्हाड रत्नमाला आशोक 8) राठोड शिला संदीप 9) शेख अरिफा मुरताजा 10) शेख मीनाजबी जुमेखा 11) धोत्रे मिराबाई पांडुरंग सर्व रा. घुंसी पो. मच्छिंद्र चिचोली ता. घनसावंगी जि. जालना
3)क्र. 03/2025 1) आव्हाड रत्नमाला आशोक 2) सखुबाई सुखदेव राठोड 3) समय्या अलीम शेख 4) शेख रुक्सानबी बकतर 5) राजुबाई आत्माराम वगरे 6) पवार लताबाई सुभाष 7) हालिमाबी राजु देशमुख 8) संजिवनी पांडुरंग ढेरे रा. घुंसी पो. मच्छिंद्र चिचोली ता. घनसावंगी जि. जालना
4) ल. क्र. 04/2025 1) संजिवनी पांडुरंग ढेरे 2) समय्या अलीम शेख 3) शेख रुक्सानबी बकतर 4) राजुबाई आत्माराम वगरे 5) पवार लताबाई सुभाष 6) हालिमाबी राजु देशमुख 7) शेख बसीरा कदीर 8) आव्हाड रत्नमाला आशोक 9) राठोड शिला संदीप 10) शेख अरिफा अकतर 11) धोत्रे मिराबाई पांडुरंग सर्व रा. घुंसी पो. मच्छिंद्र चिचोली ता. घनसावंगी जि. जालना
5) ल. क्र. 05/2025 1) राजुबाई आत्माराम वगरे 2) पवार लताबाई सुभाष 3) हालिमाबी राजु देशमुख 4) संजिवनी पांडुरंग ढेरे 5) शेख बसीरा कदीर 6) आव्हाड रत्नमाला आशोक 7) राठोड शिला संदीप 8) शेख अरिफा मुरताजा 9) मीनाजबी जुमेखा शेख 10) धोत्रे मिराबाई पांडुरंग 11) सखुबाई सुखदेव राठोड सर्व रा. घुंसी पो. मच्छिंद्र चिचोली ता. घनसावंगी जि. जालना
6) क्र. 06/2025 1) समय्या अलीम शेख 2) आयेशा अय्याज देशमुख 3) राजुबाई आत्मराम वगरे 4) शेख सुलताना शेख रहेमत 5) हालिमाबी राजु देशमुख 6) संजिवनी पांडुरंग ढेरे 7) शेख बसीरा शेख कदीर 8) पवार लताबाई सुभाष सर्व रा. घुंसी पो. मच्छिंद्र चिचोली ता. घनसावंगी जि. जालना
7) क्र. 07/2025 1)शेख आरीफा शेख मुर्तूजा 2) सखुबाई सुखदेव राठोड 3)रुकसानाबी शेख बत्कीयार रा.घुंसी पो. मच्छिंद्र चिचोली ता. घनसावंगी
8) ल. क्र. 08/2025 1) सखुबाई सुखदेव राठोड 2) सुमय्या अलिम शेख 3) रुकसानाबी बख्तर शेख 4) राजुबाई आत्माराम वगरे 5) लताबाई सुभाष पवार 6) हलिमाबी राजु शेख 7) संजिवनी पांडुरंग ढेरे 8) बशीरा कदिर शेख 9) रत्नमाला अशोक अव्हाड 10) शिला संदिप राठोड 11) शेख अरिफा अक्तर सर्व रा. घोन्सी पो. मच्छिंद्र चिचोली ता. घनसावंगी जि. जालना
9) ल. क्र. 09/2025 1) शेख मीनाजबी जुमेखा 2) सखुबाई सुखदेव राठोड 3) सुमय्या अलिम शेख 4) रुकसानाबी बख्तर शेख 5) राजुबाई आत्माराम वगरे 6) लताबाई सुभाष पवार 7) देशमुख हलिमाबी राजु 8) संजिवनी पांडुरंग ढेरे 9) बशीरा कदिर शेख 10) रत्नमाला अशोक अव्हाड 11) शिला संदिप राठोड सर्व रा. घोन्सी पो. मच्छिंद्र चिचोली ता. घनसावंगी जि. जालना
10) ल. क्र. 10/2025 1) उज्वला शहाजी सोळंके 2) राजश्री गणेश सोळंके 3) मिराबाई सुरेश जाधव 4) अरूणा अण्णा सोळंके 5) प्रभा हनुमंत सोळंके 6) पुजा भरत सोळंके 7) साधना सुनिल सोळंके 8) सिमा विठ्ठल सोळंके सर्व रा. काऱ्हाळा ता. परतुर जि. जालना
11) ल. क्र. 11/2025 1) सिमा विठ्ठल सोळंके 2) राजश्री गणेश सोळंके 3) मिराबाई सुरेश जाधव 4) उज्वला शहाजी सोळंके 5) अरूणा अण्णा सोळंके 6) प्रभा हनुमंत सोळंके 7) पुजा भरत सोळंके 8) साधना सुनिल सोळंके सर्व रा. काऱ्हाळा ता. परतुर जि. जालना
12) ल. क्र. 12/2025 1) साधना सुनिल सोळंके 2) सिमा विठ्ठल सोळंके 3) पुजा भरत सोळंके 4) प्रभा हनुमंत सोळंके 5) अरूणा अण्णा सोळंके 6) उज्वला शहाजी सोळंके 7) मिराबाई सुरेश जाधव 8) राजश्री गणेश सोळंके सर्व रा. काऱ्हाळा ता. परतुर जि. जालना
13) ल. क्र. 13/2025 1) सुगंधा वसंत आर्दड 2) राजकन्या सोपान सोळंके 3) सिंधु रगुनाथ शेळके 4) मंदा भागवत सोळंके 5) आयोध्या गंगाधर सोळंके सर्व रा. काऱ्हाळा ता. परतुर जि. जालना
14) ल. क्र. 14/2025 1) राजकन्या सोपान सोळंके 2) सुगंधा वसंत आर्दड 3) सिंधु रगुनाथ शेळके 4) मंदा भागवत सोळंके 5) आयोध्या गंगाधर सोळंके सर्व रा. काऱ्हाळा ता. परतुर जि. जालना
15) ल. क्र. 15/2025 1) सिंधु रगुनाथ शेळके 2) सुगंधा वसंत आर्दड 3) राजकन्या सोपान सोळंके 4) मंदा भागवत सोळंके 5) आयोध्या गंगाधर सोळंके सर्व रा. काऱ्हाळा ता. परतुर जि. जालना
16) ल. क्र. 16/2025 1) राजश्री गणेश सोळंके 2) मिराबाई सुरेश जाधव 3) उज्वला शहाजी सोळंके 4) अरूणा अण्णा सोळंके 5) प्रभा हनुमंत सोळंके 6) पुजा भरत सोळंके 7) साधना सुनिल सोळंके 8) सिमा विठ्ठल सोळंके सर्व रा. काऱ्हाळा ता. परतुर जि. जालना
17) ल. क्र. 17/2025 1) देशमुख हलिमाबी राजु 2) सखुबाई सुखदेव राठोड 3) सुमय्या अलिम शेख 4) रुकसानाबी कदीर शेख 5) राजुबाई आत्माराम वगरे 6) लताबाई सुभाष पवार 7) संजिवनी पांडुरंग ढेरे 8) बशीरा कदिर शेख 9) शिला संदिप राठोड 10) शेख अरिफा मुर्तुजा 11) रत्नमाला अशोक अव्हाड सर्व रा. घोन्सी पो. मच्छिंद्र चिचोली ता. घनसावंगी जि. जालना
18) ल. क्र. 18/2025 1) शिला संदिप राठोड 2) सखुबाई सुखदेव राठोड 3) सुमय्या अलिम शेख 4) रुकसानाबी कदीर शेख 5) राजुबाई आत्माराम वगरे 6) लताबाई सुभाष पवार 7) देशमुख हलिमाबी राजु 8) संजिवनी पांडुरंग ढेरे 9) बशीरा कदिर शेख 10) शेख अरिफा मुर्तुजा 11) रत्नमाला अशोक अव्हाड सर्व रा. घोन्सी पो. मच्छिंद्र चिचोली ता. घनसावंगी जि. जालना
19) ल. क्र. 19/2025 1) सोमेश्वर माणिक मोरे 2) संदिप दगडुबा मोरे सर्व रा. कारी ता. धारूर जि. बीड
20) ल. क्र. 20/2025 1) शेख हमीद शेख अंबीर 2) अलाउद्दीन अजिज शेख सर्व रा. हादगाव ता. पाथरी जि. बीड
21) ल. क्र. 21/2025 1) विजयसिंह रावसाहेब पांडुळे 2) भगवान रामभाऊ पांडुळे सर्व रा. नरवाडी ता. जि. परभणी
22) ल. क्र. 22/2025 1) दिपक गौतम भालेराव 2) अनिल गंगाधर धरमे रा. अंधापुरी पो. गुंज (खुर्द) ता. पाथरी जि. परभणी
23) क्र. 23/2025 1) शेख कलिम इब्राहिम रा. फकराबाद, मोहल्ला, पाथरी 2) विजयसिंह प्रल्हादराव पाटील रा. पाटील बाजार, पाथरी ता. पाथरी
24) ल. क्र. 24/2025 1) विलास प्रकाश काळे 2) रवि दगडुबा वाघमारे सर्व रा. वाणी संगम, ता. सोनपेठ जि. परभणी
25) ल. क्र. 25/2025 1) विश्वजित बाबासाहेब निर्वळ 2) ईश्वर देवीदास टेंगसे सर्व रा. रेणापुर ता. जि. परभणी
26) क्र. 26/2025 1) सतिष गणेश सोळंके रा. सिंगोना ता. परतुर 2) गजानन बालासाहेब सोळंके रा. अकोली पो. रायगव्हान ता. परतुर जि. जालना
27) क्र. 27/2025 1) महादेव नवनाथ नागरगोजे रा. वडगाव गुंधा ता. बीड 2) विकास शिवाजी गोरे रा. गाडेकर निवास, शाहु नगर, बीड ता. जि. बीड
28) ल. क्र. 28/2025 1) सुधाकर मनोहर हरगावकर 2) राजहंस किसन जोशी सर्व रा. मुळेगाव ता. केज जि. बीड
29) ल. क्र. 29/2025 1) अनिल सुभाष चव्हाण रा. कौडगाव हुडा पो. पिंपळगाव गाडे ता. परळी जि. बीड 2) ज्ञानेश्वर गोपीनाथ राठोड रा. मसला तांडा पो. गुंज (खुर्द) ता. पाथरी जि. परभणी
30) ल. क्र. 30/2025 1) अमोल शेषेराव लांडगे 2) रोहिदास गंपु राठोड सर्व रा. लिंबा (दे) ता. पाथरी जि. परभणी
31) क्र. 31/2025 1) अच्युत नारायणराव लिंगायत रा. फुले नगर, माजलगाव 2) रोहन निवृत्ती गायसमुद्रे रा. केसापुरी कँप, माजलगाव जि. बीड
32) ल. क्र. 32/2025 1) शेख जाफर तुराब 2) हरिभाऊ मारूती चाळक सर्व रा. एकदरा पो. तालखेड ता. माजलगाव जि. बीड
33) ल. क्र. 33/2025 1) अभिजीत रूस्तुमराव दुधाटे 2) अमोल उत्तमराव दुधाटे सर्व रा. आरखेड ता. पालम जि. परभणी
34) ल. क्र. 34/2025 1) कैलास गोरख सोळंके 2) संतोष अशोक सोळंके सर्व रा. मोहखेड ता. धारूर जि. बीड
35) ल. क्र. 35/2025 1) सोळंके उषाबाई कल्यानराव 2) सोळंके शिला संतोष 3) सोळंके मंदा सोनाजी 4) सोळंके संजीवनी दत्ता 5) सोळंके वर्षा दादासाहेब 6) सोळंके मीना गणेश सर्व रा. काऱ्हाळा ता. परतुर जि. जालना
36) ल. क्र. 36/2025 1) सोळंके शिला संतोष 2) सोळंके मंदा सोनाजी 3) सोळंके संजीवनी दत्ता 4) सोळंके वर्षा दादासाहेब 5) सोळंके मीना गणेश 6) सोळंके उषाबाई कल्यानराव सर्व रा. काऱ्हाळा ता. परतुर जि. जालना
37) ल. क्र. 37/2025 1) सोळंके मंदा सोनाजी 2) सोळंके संजीवनी दत्ता 3) सोळंके वर्षा दादासाहेब 4) सोळंके मीना गणेश 5) सोळंके उषाबाई कल्यानराव 6) सोळंके शिला संतोष सर्व रा. काऱ्हाळा ता. परतुर जि. जालना
38) ल. क्र. 38/2025 1) सोळंके मीना गणेश 2) सोळंके उषाबाई कल्यानराव 3) सोळंके शिला संतोष 4) सोळंके मंदा सोनाजी 5) सोळंके संजीवनी दत्ता 6) सोळंके वर्षा दादासाहेब सर्व रा. काऱ्हाळा ता. परतुर जि. जालना
39) ल. क्र. 39/2025 1) सोळंके राजश्री गणेशराव 2) जाधव मिराबाई सुरेश 3) सोळंके उजवला शहाजी 4) सोळंके अरुणा अण्णा 5) सोळंके प्रभा हनुमंत 6) सोळंके पुजा भारत 7) सोळंके साधना सुनिल 8) सोळंके सिमा विठ्ठल रा. काऱ्हाळा ता. परतुर जि. जालना
40) ल. क्र. 43/2025 1) आव्हाड रत्नमाला अशोक 2) धोत्रे मिराबाई पांडुरंग 3) प्रविण गुलशन शेख 4) शिला संदिप राठोड 5) सविताबाई शांतीराम आव्हाड 6) शेख अरेफा मुर्तुजा 7) सखुबाई सुखदेव राठोड 8) रुक्सना शेख बक्तीयार 9) शेख मिनाजबी जुमेख्खा सर्व रा. घोन्सी ता. घनसावंगी जि. जालना
41) ल. क्र. 44/2025 1) जगताप अर्चना ज्ञानेश्वर 2) मुळे गोदावरी बाळु 3) मुद्रुका पिराजी यादव 4) मंदा इंदर निंबाळकर 5) धनवडे कलावती अर्जुन रा. श्रृंगारवाडी पो. तालखेड ता. माजलगाव जि. बीड
42) ल. क्र. 45/2025 1) कानडी मिरा दिलीप 2) अडागळे सुनिता रामभाऊ 3) पिंजारी आयेशा अयुब 4) कानडी संगिता नवनाथ 5) गरड अश्विनी नवनाथ रा. टाकरवन ता. माजलगाव जि. बीड
43) ल. क्र. 47/2025 1) लाटे संध्या विष्णु 2) लाटे अशाबाई रामभाऊ 3) डाके मनिषा संजय 4) लाटे रेखा हनुमंत 5) पांचाळ राणी नारायण रा. बाभळगाव पो. दिंद्रुड ता. माजलगाव जि. बीड
44) ल. क्र. 49/2025 1) वाव्हळे आशा सुरेश 2) गणगे मिनाक्षी शिवाजी 3) सरकटे अनिता गणेश 4) बोराडे लता प्रतापराव 5) वायाळ मनिषा युवराज रा. घारे कॉलनी, मुक्ताई निवास, मंठा ता. मंठा जि. जालना
45) ल. क्र. 50/2025 1) सरकटे अनिता गणेश 2) बोराडे लता प्रतापराव 3) वायाळ मनिषा युवराज 4) वाव्हळे आशा सुरेश 5) गणगे मिनाक्षी शिवाजी रा. घारे कॉलनी, मुक्ताई निवास, मंठा ता. मंठा जि. जालना
46) ल. क्र. 51/2025 1) शेख जरिना गुलाम रसुल 2) फुलमाळी रेखा प्रदिप 3) साबळे मजुळाबाई कांतीलाल 4) हिवाळे लता सुरेश 5) कांबळे अनुसया अनिल रा. पंजेतन मोहल्ला, परतुर ता. परतुर जि. जालना
47) ल. क्र. 52/2025 1) साबळे मजुळाबाई कांतीलाल 2) हिवाळे लता सुरेश 3) कांबळे अनुसया अनिल 4) शेख जरिना गुलाम रसुल 5) फुलमाळी रेखा प्रदिप रा. पंजेतन मोहल्ला, परतुर ता. परतुर जि. जालना
48) क्र. 54/2025 1) घुले शोभा सुरेश 2) सांगुळे रेणुका सुरेश 3) वायाळ अश्विनी विजय 4) पवार उषा सुनिल रा. घारे कॉलनी, मंठा जि. जालना
49) ल. क्र. 55/2025 1) घुले मानसिंग प्रविण 2) कुरेशी नसिमबी दिलावर 3) राऊत मिनाताई राजेभाऊ 4) घोडे शितल अनिल 5) मोरे रेखा सुभाषराव 6) शेरे अनिता सुनिल रा. घारे कॉलनी, मंठा ता. मंठा जि. जालना
50) ल. क्र. 56/2025 1) राऊत मिनाताई राजेभाऊ 2) घोडे शितल अनिल 3) मोरे रेखा सुभाषराव 4) शेरे अनिता सुनिल 5) घुले मानसिंग प्रविण 6) कुरेशी नसिमबी दिलावर रा. घारे कॉलनी, मंठा ता. मंठा जि. जालना
51) ल. क्र. 57/2025 1) मोरे जयश्री राजु 2) भदनेकर शितल देवानंद 3) सोनवणे पुजा सतिष 4) परळकर विमल बबन 5) चव्हाण संगिता भगवान रा. शनि मंदिर जवळ मोंडा, परतुर ता. परतुर जि. जालना
52) ल. क्र. 58/2025 1) घोडे सुनंदा अप्पासाहेब 2) शोळके लक्ष्मी सचिनन 3) मोरे मनिषा प्रदिप 4) नेवरे अनिता बाबासाहेब 5) कुरेशी गजाला हन्नान 6) घोडे विमल प्रकाश 7) शेख तब्बसुम अत्तार रा. घारे कॉलनी, मंठा ता. मंठा जि. जालना
53) ल. क्र. 59/2025 1) शिंदे संजीवनी जनार्धन 2) शेळके शिलाबाई प्रल्हाद 3) गंगा अशोक सागुते 4) शिंदे राधा ज्ञानेश्वर 5) प्रयागबाई निवृती यवले रा. काऱ्हाळा ता. परतुर जि. जालना

(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपना पैकी काहीनी घेऊन गैरहजर राहिलात. काहीनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 06/08/2025 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांसह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / आदेश करण्यात येईल. याची नोद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्यांची दिले आहे.

ॲड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

● जिल्हा विशेष ● रविवार, दि. २७ जुलै २०२५ ● पान ४



बीड पोलिसांना पडलेला प्रश्न कोणता आण्णा असेल ?

# जोपर्यंत चंद्र सूर्य तारे आहेत तोपर्यत पाकिस्तान भारताचा मारच खाणार : आ. सुरेश धस

## त्रिदल संघटनेच्या वतीने कारगील विजय दिनानिमित्त तिरंगा यात्रेचे आयोजन

**आष्टी । प्रतिनिधी**

गेली ७५ वर्षापासून स्वातंत्र्य मिळाल्यापासून पाकिस्तान भारताच्या कुरापती काढत आला आहे..घुसखोरी करून आलेल्या दहशतवाद्यांना प्रत्येक वेळी त्यांना भारतीय जवानांनी प्रत्युत्तर देऊन.. अगोदर केवळ निषेध व्हायचा परंतु आता पाकिस्तानात घुसून मारण्यात येत आहे. आज संपूर्ण देश सुरक्षित आणि बिनधास्त राहात आहोत ते फक्त भारतीय जवानांमुळेच.. त्यामुळेच जोपर्यंत चंद्र सूर्य तारे आहेत तोपर्यत पाकिस्तान भारताचा मारच खाणार आहे पाकिस्तानने कधीही भारताच्या नादी लागू नये असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले.



कारगील विजय दिनाच्या औचित्याने आष्टी शहरात सैनिक सेवा संघ मुख्यालय बीड जिल्हा व त्रिदल संघटनेच्या वतीने भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले. या यात्रेचा समारोप छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे झाला यावेळी प्रमुख मार्गदर्शक करताना आ. सुरेश धस बोलत होते. यावेळी कारगील युद्धात शहीद झालेले पाटोदा तालुक्याचे सुपुत्र शहीद सुभाष सानप यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर अभिनेते तथा व्याख्याते विक्रम जगताप, अभय धोंडे, तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, त्रिद्ल संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अंकुश खोटे, अशोक भोसले,सुनील रेडेकर यांचेसह सह त्रिदल संघटनेचे पदाधिकारी,

▶▶ उर्वरित पान २ वर

## कारगिल युद्धातील अनुभव ऐकून उपस्थित गहिवरले..!

## जय जवान आजी-माजी सैनिक संस्थेने केले कारगिल युद्धातील शहिदांना अभिवादन



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील जय जवान आजी-माजी सैनिक संस्थेने २६ व्या कारगिल विजय दिवस निमित्त शहिद भारतीय जवानांना अभिवादन केले. संस्था परिसरात युद्ध स्मारक स्तंभावर संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन पांडुरंग रघुनाथराव शेप यांच्या हस्ते रित परेड करण्यात आला. या परेडनंतर कारगिल युद्धामध्ये शहिद झालेल्या वीर सैनिकांना त्यांच्या अतुलनिय कार्याच्या स्मृती जागवत आदरांजली अर्पण करण्यात आली. या कार्यक्रमासाठी व्यासपीठावर जय जवान आजी-माजी सैनिक संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन पांडुरंग रघुनाथराव शेप, सचिव माजी सुभेदार आबासाहेब हाके, कोषाध्यक्ष बाबासाहेब केंद्रे, संचालक भरत पांचाळ, संचालक अरविंद तपसे, संचालक ज्ञानेश्वर कदम, संचालक सिंधुताई निर्मळ, सभासद दिलीप निकम, सर्व सन्माननिय सभासद श्री अंकुश काळे, गोपीनाथ काळे, राधाकिशन कुंडगर, शिवाजी गंगणे, पांडुरंग गावडे, यशवंत व्हावळे, संभाजी वाघमारे यांच्यासह यांच्यासह संस्था वसाहती मधील पुरूष व महिला भगिनी यांनी उपस्थित राहून कारगिल विजय दिवस साजरा केला. या प्रसंगी कारगिल युद्धामध्ये

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड: राज्याच्या मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त नाथापूर चे सरपंच सुंदर चव्हाण यांनी जिल्हा रुग्णालयातील आज जन्मलेल्या मुला मुलींच्या सर्व मातांचा साडी चोळी देऊन केला सन्मान .. यावेळी जिल्हा रुग्णाच्या दिनेश ढेगे, सुरेश पवार, कपिल जोगदंड, आकाश गायवाळ यांची उपस्थिती होती.*

## थोडक्यात

### माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पासष्ठव्या वाढदिवसानिमित्त दहाफूट उंचीची पासष्ठ वृक्षची लागवड: शिवसेना - शिक्षकसेनेचा उपक्रम



**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या पासष्ठव्या वाढदिवसानिमित्त शिवसेना व शिक्षकसेनेच्या वतीने दहाफुट उंचीचे पासष्ठ वृक्षाचे रोपण जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वात करण्यात आले. शिक्षकसेनेच्या वतीने उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा वाढदिवस प्रेरणा वर्ष म्हणून साजरा होत आहे. शिवसेना व शिक्षकसेनेच्या वतीने आज बीड शहरातील पांगरी रोड परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये जांभूळ, पळस, नांदूरकी, इंडियन क्रिस्मस ट्री या सारखी उंच वाढणारी व परिपूर्ण वाढ झालेली दहा फुट उंचीची पासष्ट झाडे लावण्यात आली. या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या सह राज्य शिक्षक सेनेचे विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, महिला आघाडी च्या मीराताई नवले, उपजिल्हा प्रमुख राजाभाऊ माहुवाले, माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे महाराष्ट्रराज्य शिक्षकसेनेचे उपाध्यक्ष मा. दत्ताभाऊ पवार, मराठवाडा अध्यक्ष नामदेवरावजी सोनवणे , महाराष्ट्रराज्य तंत्रनिकेतन कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष रवींद्र दहाटे सर, शिवसेनेचे जेष्ठ सल्लागार व शिवसैनिक संभाजी गजले सर, शिक्षकसेना जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ, संजय ढाकण, जिल्हा सरचिटणीस नरेश गंधगे, कार्याध्यक्ष आप्पा डोके, जिल्हा उपाध्यक्ष महादेव वाघमारे वाघमारे, बीड तालुका अध्यक्ष उद्धवजी घोडके, प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण वाघमारे, राजाभाऊ हुरकुडे गणेश लोणकर, रंगनाथ पैठणकर, सचिन साळुंखे सह आदी शिवसैनिक उपस्थित होते.

### बेकायदेशीर गावठी पिस्टल बाळगण्याच्या गुन्ह्यातून आरोपीस जामीन मंजूर: ॲड.अजित ओव्हाळ

**बीड । प्रतिनिधी**



बीड ग्रामीण पोलीसना मिळालेल्या माहिती नुसार नवगण राजुरी ता.जि.बीड येथील बस स्थानकाजवळ विना नावाच्या पान टप्परी मध्ये नामे प्रदीप अशोक वखरे हा त्याच्या अंगा मध्ये गुलाबी रंगाचा टि शर्ट व काळ्या रंगाची जीन्स पॅन्ट कपड्या मध्ये बसलेला आहे त्याच्या कॅमेरेला एक गावठी पिस्टल(बंदुक)असल्याचे बीड ग्रामीण पोलिसाना माहिती मिळाली असता दि.२२-०७-२०२५ रोजी सदरच्या ठिकाणी बीड ग्रामीण पोलिसांनी प्रदीप अशोक वखरे रा.नवगण राजुरी, बीड यांला त्याच्या टप्परी तुन

▶▶ उर्वरित पान २ वर
















